# News Paper Articles

पुढारी

# मी तुम्हाला अजिबात पचणार नाही

## लोकसभा निवडणुकीची ऑफर दिल्यानंतर नानांनी दिले होते उत्तर : मंत्री शेला

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

नाना पाटेकर यांना भाजपने लोकसभेची निवडणूक लढवण्याबाबत विचारणा केली होती. यावेळी नाना पाटेकर हे देवेंद्र फडणवीस यांनाही भेटले होते. त्या भेटीत नानांनी, मी तुम्हाला पचणार नाही, अशा आपल्या खास शैलीत उत्तर दिल्याची आठवण सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी नानांना आदरांजली वाहताना सांगितली. ६ ऑक्टोबर रोजी त्यांनी समाजासाठी काहीतरी करण्याची तयारी दर्शवली होती. यावर चर्चा करण्यासाठी मी ९ ऑक्टोबर रोजी मुंबईत येणार असल्याचे सांगितले होते, पण ती भेट राहूनच गेल्याचे शेलार म्हणाले.

दिवंगत नाना पाटेकर यांच्या विविध पैलूंना उजाळा देण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ अर्थात फिल्मसिटीच्या वतीने 'आठवणीतले नाना' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी रवींद्र नाट्य मंदिरात करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी नाना पाटेकर यांना आदरांजली वाहिली.

दादासाहेब फाळके रसास्वाद मंडळाच्या उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात नाना पाटेकर यांच्या गाजलेल्या 'प्रहार' चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे, ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम, जयवंत वाडकर, दिग्दर्शक संजय जाधव, मेहूलकुमार, पुरूषोत्तम बेर्डे, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टगंडी, वर्षा उसगावकर, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील उपस्थित होते.

हिंदी सिनेमात माझे पाय नानामुळे रोवले गेले. माझ्या पत्नीला कर्करोगाचे निदान झाले. पार्थ घोषकडून मला चित्रीकरणात समजावून घेतले, हे फक्त नानाच करू शकतो, त्याने मला सख्ख्या भावासारखे प्रेम दिले, अशा आठवणी शिवाजी साटम यांनी जागवल्या.

ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टगंडी नाना यांच्याबद्दलच्या आठवणी सांगतांना म्हणाल्या, मी चांगुणा या माझ्या पहिल्या नाटकात काम केले. त्यांच्या फटकळ स्वभावामुळे राग यायचा. पण तो दिलजमाईने नंतर वागायचा. स्टारडम मिळाल्यानंतरही नानामध्ये बदल झाला नाही, वर्षा उसगावकर म्हणाल्या, मी गंमत करत असतो, माझे बोलणे फार गांभीर्याने घेत जाऊ नकोस, अशा तिरंगा चित्रपटाच्या दरम्यानच्या आठवणी सांगितल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज चव्हाण यांनी केले.




### नानांचा अभिनय पाहिला आणि रागही पाहिला : मुंढे

नाना यांचा अभिनय पडद्यावर बघितला, त्यांचा राग बघितला, पण हेच नाना जेव्हा शेतकऱ्यांच्या बांधावर जायचे, तेव्हा त्यांच्यातला माणूस मी पाहिला. २०१५-१६ दुष्काळाच्या वेळी मी सोलापूरचा जिल्हाधिकारी होतो, तेव्हा नाना आणि मकरंद अनासपुरे 'नाम'च्या कामासाठी आले होते, त्यावेळी मी त्यांची आवर्जून भेट घेतली. आपल्या माणसांना आपण मदत करू शकत नसू, तर आपण कसले माणूस, त्या माणसांच्या मायेचा पदर हजारो, लाखो माणसांपर्यंत त्यांनी नेला, शासन सुध्दा इतकं नियोजनबध्द काम करू शकले नसते, अ उद्गार अन्न आणि औषध महामंडळाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यावेळी काढले. अलीकडेच नाना यांनी फोन केला तेव्हा लव्ह यू बाळा... हे शेवटचे वाक्य होते. त्यांना श्रद्धांजली वाहण्याची माझी हिंमत होत नाही, असे तुकाराम मुंढे म्हणाले.

Mumbai Edition
Oct 15, 2026 Page No. 08
Powered by: erelego.com

लोकमत

## 'आठवणीतले नाना' सांगताना हरवून गेले सभागृह



पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या मिनी थिएटरमध्ये आयोजित 'आठवणीतले नाना' या आदरांजली सभेत कलावंत, अधिकाऱ्यांनी नानांचा सहवास , प्रेम, रोखठोक आणि रांगडा स्वभाव अशा अनेक आठवणींना उजाळा दिला. **छाया : दत्ता खेडेकर**

## आयुष-ॲलोपॅथी समन्वयासाठी तज्ज्ञ समिती स्थापन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आयुर्वेद, योग-निसर्गोपचार, होमिओपॅथी, युनानी व आधुनिक ॲलोपॅथी उपचारपद्धतींचा समन्वय साधून रुग्णांना सुरक्षित व पूरक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. सार्वजनिक रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये एकात्मिक वैद्यकशास्त्राची अंमलबजावणी कशी करावी, याबाबत ही समिती दोन महिन्यांत अहवाल सादर करणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील जीवशास्त्रज्ञ प्रा. डॉ. भूषण पटवर्धन समितीचे अध्यक्ष असून, डॉ. सुरेश बी. पाटणकर सहअध्यक्ष आहेत. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा आयुष सल्लागार, युनानी व आयुर्वेद महाविद्यालये आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रतिनिधी समितीत आहेत. डॉ. विलास सरवदे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

राज्यातील विविध उपचारपद्धती, उपलब्ध मनुष्यबळ आणि आरोग्यसेवांचा आढावा घेऊन समिती एकात्मिक उपचारांसाठी मार्गदर्शक सूचना तयार करणार आहे.

Mumbai Main
Page No. 8 Oct 15, 2026
Powered by: erelego.com

# मैत्री, माणुसकी, कला-कौशल्याला उजळा!

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

### 'आठवणीतले नाना'मध्ये सहकलाकार भावूक



शैलेश जाधव

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या कला, स्वभाव, मैत्री आणि माणुसकीच्या विविध पैलूंना उजळा देणारा 'आठवणीतले नाना' हा विशेष कार्यक्रम बुधवार, १४ ऑक्टोबरला प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात नानांसोबतच्या आठवणी सांगताना कलाकार भावूक झाले.

'साधारण १९७५च्या सुमारास माझे पहिले नाटक 'चांगुणा' सुरू होते. त्यात सतीश पुळेकर आणि मी काम करत होतो. सतीशच्या ओळखीने नाना आमच्यासोबत आला. पुढे 'आविष्कार'मधून त्याने अनेक नाटके केली', असे नानांसोबतच्या सुरुवातीच्या आठवणी सांगताना ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी म्हणाल्या. नानांचा फटकळ स्वभाव, तसेच स्टारडम मिळूनही न बदललेला साधेपणा यांचाही त्यांनी उल्लेख केला.

अभिनेते शिवाजी साटम यांनी नानांच्या मैत्रीतील जिव्हाळा उलगडला. पत्नीच्या कर्करोगावरील उपचारांच्या काळात नानांनी आपल्या चित्रीकरणाच्या वेळा बदलून घेतल्या होत्या, ही आठवण सांगताना साटम भावूक झाले. 'सख्ख्या भावानेही कदाचित केले नसते, इतके त्याने माझ्यासाठी केले. हिंदी चित्रपटसृष्टीत माझे पाय नानामुळे रोवले गेले', असे ते म्हणाले. दिग्दर्शक-अभिनेते पुरुषोत्तम बेर्डे यांनी नानांच्या चित्रकलेपासून रंगभूमीवरील प्रवासापर्यंत आणि शेतावरील शांत आयुष्यापर्यंतच्या अनेक आठवणी सांगितल्या.

अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी 'तिरंगा' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यानचा अनुभव सांगितला. 'नाना पहिल्यांदा नायक म्हणून काम करणार असल्याचे कळल्यावर त्यांना आश्चर्य वाटले होते', असे त्या म्हणाल्या.

या आठवणींमधून नाना पाटेकर यांचे कलाकार म्हणून सामर्थ्य, मित्र म्हणून जिव्हाळा आणि माणूस म्हणून वेगळेपण पुन्हा अधोरेखित झाले.

लोकमत

# नाना पाटेकरांनी लोकसभा निवडणूक लढवायची होती

## सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांचे मत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी लोकसभेची निवडणूक लढवावी, अशी माझी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची इच्छा होती. त्यासाठी नानांची भेट घेतली, तेव्हा ते म्हणाले की, तुम्हाला मी पचणार नाही रे... निवडणूक जिंकल्यावर मला जे पाहिजे ते बोललो, तर तुमची अडचण होईल... त्यानंतरही त्यांनी आमच्याशी मैत्री जपली. ते केवळ पैसे देऊन ते थांबत नसायचे, तर काम करूनही घ्यायचे. राज्य सरकार नानांचे कार्य पुढे नेण्यासाठी पूर्ण ताकदीने उतरेल, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी बुधवारी येथे केले.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने दिवंगत अभिनेते नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी 'आठवणीतले नाना' या आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या मिनी थिएटरमध्ये आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला अ‍ॅड. आशिष शेलार, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या स्वाती म्हसे पाटील, ज्येष्ठ दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे, शिवाजी साटम, रोहिणी हट्टंगडी, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे, दिग्दर्शक मेहुल कुमार, अभिनेत्री वर्षा उसगावकर, दिग्दर्शक संजय जाधव, अर्चना नेवरेकर, गणेश यादव, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले आदी मंडळी उपस्थित होते.

## त्याने अंत्यविधीची जागाही दाखविली होती

आपल्या भावना व्यक्त करताना पुरुषोत्तम बेर्डे म्हणाले की, त्याच्या हातात चित्रकला ठासून भरली होती. नानाची भाषा आम्हा मित्रांना माहीत होती. नानाच्या भाषेतच त्याच्याशी बोलले की, लगेच रिप्लाय यायचा. त्याने त्याच्या अंत्यविधीची जागाही दाखवली होती.

**मला हिंदी सिनेमात ओढून आणले :** शिवाजी साटम म्हणाले की, नानाने मला



हिंदी सिनेमात ओढून आणले. "यशवंत"मधील इन्स्पेक्टर सुरुवातीला नाकारला होता, पण त्याच्या फोनसमोर माझे काही चालू शकले नाही. सख्ख्या भावाने जेवढे केले नसते, तेवढे नानाने माझ्यासाठी केले.

**रुग्णवाहिकेतून आला, सीन पूर्ण केला :** दिग्दर्शक मेहुल कुमार म्हणाले,



रजनीकांत आणि नसिरुद्दीन शाह यांनी "तिरंगा"साठी नकार दिल्यावर नानाला विचारले, तेव्हा सुरुवातीला त्यांनी नकार दिला, पण नंतर तयार झाले. राजकुमार आणि नाना ही दोन परस्परविरोधी व्यक्तिमत्त्व एकाच सिनेमात आणून सिनेमा पूर्ण करण्याची कसरत मला करावी लागली. "क्रांतिवीर"च्या क्लायमॅक्स सीनच्या वेळी नाना आजारी होते. थेट हॉस्पिटलमधून रुग्णवाहिकेतून आला, एका दिवसात सीन पूर्ण केला आणि सिनेमा हिट झाला.

**मला धक्का बसला होता :** वर्षा उसगावकर म्हणाल्या की, "तिरंगा"



सिनेमात नानांची नायिका असल्याचे समजल्यावर मी सुरुवातीला आश्चर्यचकित झाले होते. माझ्या एंट्रीचा सीन नानांनी शूट केला होता. त्यावेळीही मला धक्का बसला होता. महाराष्ट्राचा नायक सिनेमात माझा नायक होता याचा अभिमान वाटतो.

**असा 'नाना' होणे नाही :** रोहिणी हट्टंगडी म्हणाल्या की, "चांगुणा" नाटकाच्या निमित्ताने नानाची पहिली भेट झाली. आविष्कारमध्ये नाटके केल्यानंतर त्याच्या कारकिर्दीला कलाटणी मिळाली. 'प्रतिघात' या हिंदी सिनेमात आम्ही एकत्र काम केले. त्याचा फटकळ स्वभाव शेवटपर्यंत तसाच राहिला. स्टारडम मिळाल्यावरही नाना बदलला नाही. असा 'नाना' होणे नाही.

# Online Articles

https://marathi.abplive.com/entertainment/nana-patekar-condolence-meet-jaywant-wadkar-video-viral-marathi-actor-sat-on-the-floor-instead-of-on-chair-mumbai-news-1442433

https://maharashtratimes.com/entertainment/entertainment-news/bollywood-news/nana-patekar-prayer-meet-bollywod-celebrities-spotted-pays-tribute-to-late-actor/articleshow/134946336.cms

https://www.loksatta.com/maharashtra/tukaram-mundhe-emotional-speech-nana-patekar-condolence-meeting-tribute-vsd-99-6192540/

https://www.lokmat.com/filmy/photos/bollywood/after-the-funeral-only-a-handful-of-bollywood-celebrities-were-present-at-nana-patekars-prayer-meet-a-a301/

https://youtu.be/64CDI-fcvk0?si=PBcTSME0SDucQ3Ap

https://www.amarujala.com/entertainment/bollywood/nana-patekar-prayer-meet-varsha-usgaonkar-shivaji-satam-among-other-celebs-pay-tribute-to-the-late-actor-2026-10-14

https://navbharattimes.indiatimes.com/entertainment/news-from-bollywood/celebs-attended-nana-patekar-prayer-meet-from-commissioner-tukaram-mundhe-to-actor-shivaji-satam-spotted/articleshow/134945830.cms

https://www.abplive.com/entertainment/bollywood/nana-patekar-prayer-meet-bollywod-celebs-spotted-pays-tribute-to-late-actor-3202124

https://www.bhaskar.com/entertainment/bollywood/news/mumbai-nana-patekar-prayer-meet-shivaji-satam-tukaram-mundhe-visit-139361698.html